(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)

NAVJYOT / Vol. XIV / Issue – I ISSN 2277-8063

# सांगली जिल्हा विधानसभा निवडणूक २०२४

**रोहिणी सतीश कुंभार संशोधक विद्यार्थिनी, राज्यशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर**

---

**प्रस्तावना :**

महाराष्ट्र विधानसभेचे २८८ सदस्य या निवडणुकीच्या माध्यमातून निवडले जाणार आहेत. यापूर्वी २०१९ साली झालेल्या विधानसभा निवडणुकीत भाजपला १०५, शिवसेनेला ५६,-राष्ट्रवादी कॉंग्रेसला ५४ तर कॉंग्रेस पक्षाला ४४ जागा मिळाल्या होत्या. एस. यएम पक्षाला दोन तर मनसेला एक जागा मिळाली होती. २०१९ साली शिवसेना पक्ष भाजपसोबतच्या युतीतून बाहेर पंडून त्यांनी राष्ट्रवादी कॉंग्रेस आणि कॉंग्रेसशी हातमिळवणी करून उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली महाविकास आघाडी सरकार स्थापन केलं होतं. हे सरकार अडीच वर्ष चाललं. जून २०२२ मध्ये शिवसेनेत मोठं बंड झालं आणि शिवसेना नेते एकनाथ शिंदे यांनी ४० आमदार फोडून बाहेर पडले. भाजपच्या पाठिंब्यावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राज्यात महायुतीचे सरकार स्थापन केले. शिवाय जुलै २०२३ मध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेसमध्ये अजित पवार गट फुटून बाहेर पडला आणि महायुती सरकारमध्ये सामील झाला. विरोधी पक्षातील शिवसेनेचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे, राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार आणि कॉंग्रेस पक्ष एकत्र आल्यामुळे महाराष्ट्राची २०२४ सालची विधानसभा निवडणूक अटीतटीची झाली. या निवडणुकीतून अनेक बदल मतदारसंघा निहाय घडलेले आहेत. त्यातील पश्चिम महाराष्ट्रातील सांगली विधान सभा मतदारसंघात २०२४ मध्ये झालेल्या बदलाचा अभ्यास प्रस्तुत लेखात केला आहे.

**उद्देश :**

१. विधानसभा निवडणूक प्रक्रियेचा अभ्यास करणे.
२. २०२४ पूर्वीची सांगली विधानसभा निवडणूक निकालाचा अभ्यास करणे
३. २०२४ च्या सांगली विधानसभा निवडणुकीचा अभ्यास करणे.

**महाराष्ट्र विधानसभा निवडणूक:**

महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यानंतर पहिल्यांदा राज्य विधानसभेच्या निवडणुका १९६२ साली झाल्या. यामध्ये सुरुवातीला जनसंघ, जनता पार्टी आणि सध्याची भारतीय जनता पार्टीचा उल्लेख आपण सुरुवातीपासूनच भारतीय जनता पार्टी असा केलेला आहे. यामध्ये सुरुवातीला १९७७ सालापर्यंत जनसंघ म्हणून तर १९७७ ते १९८० सालापर्यंत जनता पार्टी म्हणून त्यानंतर १९८१ पासून भारतीय जनता पार्टी या नावानं पक्षाची स्थापना झाल्यापासून भाजपा या नावाखालीच आजपर्यंत निवडणुका लढवल्या गेल्या आहेत. आता २०२४ साली पुन्हा महाराष्ट्र विधानसभेची निवडणूक होत आहे. यावेळी महाविकास आघाडी आणि महायुतीमध्ये लढत होत आहे. यामध्ये महाविकास आघाडीत उद्धव ठाकरे यांची शिवसेना, राष्ट्रवादी कॉंग्रेस आणि भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस हे प्रमुख पक्ष आहेत. तर महायुतीमध्ये भारतीय जनता पार्टी हा पक्ष तसंच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वा खालील शिवसेना पक्ष तसंच अजित पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवाती कॉंग्रेस पक्ष आमने सामने आहेत.

**सांगली जिल्हा विधानसभा व २०२४ निवडणूक :**

सांगली जिल्ह्यात आठ विधानसभा मतदारसंघ आहेत. सांगली जिल्हा राजकीयदृष्ट्या चर्चेत आणि बलाढ्य नेत्यांचा जिल्हा म्हणून ओळखला जातो. माजी मुख्यमंत्री वसंतदादा पाटील, आर आर पाटील, पतंगराव कदम यांच्यापासून ते जयंत पाटील, सुरेश खाडे, सदाभाऊ खोत, विश्वजीत कदम यांच्यापर्यंत नेत्यांची रांग या जिल्ह्यात पाहायला मिळते. सांगली जिल्ह्यात विधानसभेच्या 8 जागा आहेत. २०१४ च्या निवडणुकीत भाजपने ४, राष्ट्रवादी २, कॉंग्रेस आणि शिवसेना प्रत्येक एक जागी विजय मिळवला होता मिरज, सांगली, इस्लामपूर, शिराळा, पलूस-कडेगाव, खानापूर, तासगांव-कवठे महांकाळ व जत या विधानसभा मतदारसंघाचा २०२४ विधानसभा निवडणुकीचा माहिती पुढीलप्रमाणे आहे.

**सांगली जिल्हा विधानसभा मतदारसंघ निवडणूक २०२४**

| अ.क्र. | सांगली जिल्हा | विजयी उमेदवार | राजकीय पक्ष | पराभूत उमेदवार | राजकीय पक्ष |
|---|---|---|---|---|---|
| १ | मिरज | डॉ. सुरेश (भाऊ) दगडू खाडे | भाजप (महायुती ) | तानाजी आनंदा सातपुते | शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) |
| | मतदान | १,२९,७६६ | | ८४,५७१ | |
| २ | सांगली | धनंजय हरी गाडगीळ | भाजप (महायुती ) | पृथ्वीराज गुलाबराव पाटील | कॉंग्रेस (महाविकास |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | मतदान | १,१२,४९८ | | ७६,३६३ | आघाडी) |
| ३ | इस्लामपूर | जयंत राजाराम पाटील | शरदचंद्र पवार राष्ट्रवादी कॉंग्रेस (महाविकास आघाडी) | निशिकांत प्रकाश भोसले-पाटील | राष्ट्रवादी कॉंग्रेस (महायुती ) |
| | मतदान | १,०९,९७९ | | ९६,८५२ | |
| ४ | शिराळ | देशमुख सत्यजित शिवाजीराव | भाजप (महायुती ) | मानसिंगभाऊ फत्तेसिंगराव नाईक | शरदचंद्र पवार राष्ट्रवादी कॉंग्रेस (महाविकास आघाडी) |
| | मतदान | १,३०,७३८ | | १,०८,०४९ | |
| ५ | पलूस-कडेगाव | डॉ.विश्वजीत पतंगराव कदम | कॉंग्रेस (महाविकास आघाडी) | संग्राम संपतराव देशमुख | भाजप (महायुती ) |
| | मतदान | १,३०,७६९ | | १,००,७०५ | |
| ६ | खानापूर | बाबर सुहास अनिलभाऊ | शिवसेना (महायुती ) | वैभवदादा सदाशिव पाटील | शरदचंद्र पवार राष्ट्रवादी कॉंग्रेस (महाविकास आघाडी) |
| | मतदान | १५२६५७ | | ७५०७१ | |
| ७ | तासगांव-कवठे महांकाळ | रोहित पाटील | शरदचंद्र पवार राष्ट्रवादी कॉंग्रेस (महाविकास आघाडी) | संजयकाका पाटील | राष्ट्रवादी कॉंग्रेस (महायुती) |
| | मतदान | १,२६,४७८ | | **९९९०१** | |
| ८ | जत | गोपीचंद पडळकर | भाजप (महायुती ) | विक्रमसिंह सावंत | कॉंग्रेस (महाविकास आघाडी) |
| | मतदान | ११२७४६ | | ७४५४९ | |

संदर्भ : महाराष्ट्र निवडणूक आयोग , महाराष्ट्र शासन

सांगली जिल्ह्यातील विधानसभा मतदार संघातील २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत मिरज या मतदारसंघात महायुतीतील भारतीय जनता पार्टी डॉ. सुरेश (भाऊ) दगडू खाडे यांना उमेदवारी दिली होती. तर महाविकास आघाडीतील शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) तानाजी आनंदा सातपुते यांना उमेदवार दिली होती. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत भाजपा चे उमेदवार सुरेश दगडू खाडे यांनी विजय मिळवला होता. यावेळी सुरेश दगडू खाडे विजयी झाले आहेत.

सांगली विधानसभा मतदारसंघात यंदा कॉंग्रेसचे नेते स्व. मदन पाटील यांच्या पत्नी जयश्री पाटील यांनी बंडखोरी केल्याने मोठ्या प्रमाणात चुरस दिसून येत आहे. भाजपा महायुतीचे आमदार सुधीर गाडगीळ, कॉंग्रेसचे पृथ्वीराज पाटील आणि श्रीमती पाटील यांच्यात तिरंगी लढत झाली. या लढतीमध्ये भाजप पक्षाचे सुधीर गाडगीळ हे १,१२,४९८ विजयी झाले.

इस्लामपूर विधानसभा निवडणुकीसाठी महायुतीतील राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी निशिकांत प्रकाश भोसले-पाटील यांना उमेदवारी दिली होती, तर महाविकास आघाडीतील राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी – शरदचंद्र पवार जयंत राजाराम पाटील यांना उमेदवार दिली होती. या निवडणुकीत मतदारसंघात विविध विकासकामांसाठी निधी आणला. सहकार क्षेत्रातील साखर उद्योगाला गती दिली. ग्रामीण भागातून शहरी भागात येणाऱ्या रस्त्यांसाठी कोट्यवधी रुपयांचा निधी उपलब्ध केला. इस्लामपूर शहरात २४७७ पाणी योजना, भुयारी गटारी, घरकुल, बगीचे आदी विकास केला. हाच अजेंडा घेऊन जयंत पाटील आठव्यांदा निवडणूक लढवली तर विरोधात भाजपचे जिल्हाध्यक्ष निशिकांत पाटील यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे नेतृत्व स्वीकारून हाती 'घड्याळ' बांधले. त्यामुळे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी इस्लामपूर मतदारसंघात एन्ट्री करून घड्याळाची टिक-टिक सुरू केली. जयंत पाटील यांच्या 'तुतारी'विरोधात निशिकांत पाटील यांना उमेदवारी देऊन कडवे आव्हान उभे केले होते पण जयंत पाटील यांनी १,०९,९७९ मते प्राप्त करून विजय प्राप्त केला.

२०१९ सालच्या निवडणुकीत राष्ट्रवादीचे मानसिंगराव नाईक विरुद्ध शिवाजीराव नाईक हे पारंपरिक विरोधक मैदानात होते. त्यावेळी सम्राट महाडिकांनी बंडखोरी केली होती. मानसिंगराव नाईक यांनी१,०१,९३३ मते मिळवून विजयी झाले. तर विरोधी शिवाजीराव नाईक यांना ७६,००२ मते मिळाली होती. तर अपक्ष म्हणून लढणाऱ्या सम्राट महाडिकांना ४६ हजार मते मिळाली होती. २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीतून राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आमदार मानसिंगराव नाईक यांना पुन्हा उमेदवारी दिली होती. तर महायुतीकडून भाजपने सत्यजीत देशमुखांना उमेदवारी दिली. या ठिकाणी भाजपच्या सम्राट महाडिकांनी बंडखोरी करत अर्ज भरला होता. पण त्यांची बंडखोरी रोखण्यात देवेंद्र फडणवीसांना यश आलं. त्यामुळे या मतदारसंघात महायुती आणि महाविकास आघाडीमध्ये सरळ लढत झाली. सत्यजीत देशमुख हे महाराष्ट्राच्या विधान परिषदेचे माजी सभापती शिवाजीराव देशमुखांचे पुत्र आहेत. त्यामुळे त्यांचा या परिसरात मोठा जनसंपर्क आहे. असे असले तरी भाजपच्या सत्यजीत देशमुख यांनी राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या मानसिंग नाईक यांचा २२,६८९ मतांनी पराभव केला.

२०१९ मध्ये महाराष्ट्रात एकीकडे काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस यांची निवडणूकपूर्व आघाडी होती तर दुसरीकडे भाजपा व शिवसेना यांची युती होती. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत पलूस-कडेगाव मतदारसंघात काँग्रेस कडून कदम विश्वजीत पतंगराव यांनी निवडणूक लढवली होती. त्या निवडणुकीत त्यांना १७१४९७ मतं मिळाली होती. दुसऱ्या क्रमांकावर NOTA पक्षाचे NOTA होते. त्यांना २०६३१ मते मिळाली होती. २०२४ मध्ये पुन्हा एकदा कदम विश्वजीत पतंगराव यान कॉग्रेस उमेदवारी दिली तर संग्राम संपतराव देशमुख यांना भाजप पक्षाने उमेदवारी दिली. या वेळी निवडणूक अत्यंत चुरशी झाली. निवडणूक एकतर्फी झाली नाही. असे असले तरी कदम विश्वजीत पतंगराव १,३०,७६९ मते घेऊन विजयी झाले. पण या विजयातील अंतर खूप कमी होते.

खानापूर विधानसभा मतदारसंघ महाराष्ट्राच्या सांगली जिल्ह्यातील एक महत्त्वाचा राजकीय मतदारसंघ आहे. दुष्काळी भाग म्हणून हा परिसर ओळखला जातो आणि येथील शेतकऱ्यांना दरवर्षी पाण्याच्या समस्येचा सामना करावा लागतो. याशिवाय, हा परिसर द्राक्षांच्या उत्पादनासाठी प्रसिद्ध आहे, त्यामुळेच कृषी संबंधित मुद्दे येथे राजकारणाच्या केंद्रस्थानी असतात. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीतही शिवसेनेचे अनिल बाबर यांनी विजय मिळवला. त्यांना १,१६,९७४ मते मिळाली, तर अपक्ष उमेदवार सदाशिवराव हनमंतराव पाटील यांना ९०,६८३ मते मिळाली. २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत शिवसेना पक्षाने अनिल बाबर यांना उमेदवारी दिली तर शरदचंद्र पवार राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाने वैभवदादा पाटील याना उमेदवारी दिली. या निवडणुकीत १,५२,६५७ मतांनी अनिल बाबर हे विजयी होऊन त्यांनी आपला प्रभाव मतदारसंघावर कायम ठेवला.

जत विधानसभा निर्वाचन क्षेत्रामध्ये २०१९ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसने भारतीय जनता पार्टीच्या विजयाच्या प्रवाहाला थांबवून एक मोठा विजय मिळवला होती २०१९ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसने पुन्हा एकदा या सीटवर विजय मिळवला, जेव्हा काँग्रेसच्या विक्रमसिंह बालासाहेब सावंत यांनी ८७,१८४ मत प्राप्त केले आणि भाजपाचे विलासराव जगताप ५२,५१० मतांसह पराभूत झाले. या निकालाने काँग्रेससाठी जत मध्ये एक महत्त्वपूर्ण विजय ठरला, ज्यातून मतदारांनी भाजपापेक्षा काँग्रेसकडे आपला विश्वास दर्शवला. तर २०२४ च्या विधानसभा मतदारसंघात या यावेळी भाजप पक्षाने धनगर समाजाचे गोपीचंद पडळकर यांना उमेदवारी दिली. तर विक्रमसिंह सावंत यांना पन्हा उमेदवारी दिली. या वेळच्या निवडणुकीत भाजप पक्षाचे गोपीचंद पडळक्र हे ११२७४६ मते घेऊन विजयी झाले. त्यांनी आणि या मतदारसंघात भाजप पक्षाचा प्रभाव वाढवला.

तासगांव - कवठे महांकाळ मतदारसंघाचा राजकीय इतिहास अत्यंत महत्त्वपूर्ण आणि रंगतदार आहे. काँग्रेस पक्षाचे या क्षेत्रावर अनेक वर्षे वर्चस्व राहिलं आहे. १९६२ मध्ये काँग्रेसचे उमेदवार धोंडीराम यशवंत पाटिल यांनी या मतदारसंघातून विजय प्राप्त केला होता. त्यानंतर, १९६७ आणि १९७२ मध्ये काँग्रेसचे बाबासाहेब गोपालराव पाटिल यांना येथे परत-पुन्हा विजय मिळाला. १९७८ मध्ये काँग्रेसचे डिंकरराव कृष्णाजी पाटिल यांनी विजयी होऊन त्या पुढील वर्षी १९८० मध्ये त्याच जागेवर स्वतंत्र उमेदवार म्हणून विजय प्राप्त केला. त्यानंतर १९८५ मध्ये ते पुन्हा काँग्रेसच्या तिकिटावर निवडून आले. १९९० मध्ये काँग्रेसचे उमेदवार आर. आर. पाटिल यांनी या मतदारसंघात विजय मिळवला आणि १९९५ मध्येही त्यांनी आपली जागा कायम राखली. १९९९ च्या निवडणुकीत, आर. आर. पाटिल राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (एनसीपी) तर्फे निवडणूक लढवून विजयी झाले. ते एनसीपीसाठी अत्यंत महत्त्वाचे होते कारण २००४, २००९ आणि २०१४ च्या निवडणुकांतही ते एनसीपीच्या तिकिटावर निवडून आले. त्यांच्या विजयामुळे एनसीपी या क्षेत्रात मजबूत झाली आणि आर. आर. पाटिल यांची लोकप्रियता वाढली. आर. आर. पाटिल यांच्या अचानक निधनानंतर, २०१५ मध्ये झालेल्या पोटनिवणुकीत त्यांची पत्नी सुमनताई आर.

आर. पाटिल यांनी एनसीपीच्या तिकिटावर निवडणूक लढवून विजय मिळवला.२०१९ मध्येही सुमनताई यांनी एनसीपीच्या तिकिटावर या मतदारसंघातून विजय मिळवला. २०२४ मध्ये काँग्रेस-एनसीपी यांचा पारंपरिक प्रभाव कमी होऊन, शिवसेना दोन गटांमध्ये विभागली गेली आहे, ज्यामुळे मतदारसंघातील राजकीय समीकरणे बदलली आहेत. शिवसेनेचा एक गट भाजपाशी तर दुसरा काँग्रेसशी जुळवून घेत आहे. यावेळीशरदचंद्र पवार राष्ट्रवादी कॉग्रेस पक्षाने रोहित पवार यांना तिकीट दिले. तर भाजप पक्षातून राष्ट्रवादी कॉग्रेस पक्षात प्रवेश केलेले संजयकाका पाटील यांना राष्ट्रवादी कॉग्रेस पक्षाने तिकीट दिले. या निवडणुकीत रोहित पाटील यांनी १२६४७८ मते घेऊन विजय मिळवला. हा या मतदार संघावरील आर.आर.पाटील घराण्याचा प्रभाव असल्याचे पुन्हा एकदा सिद्ध केले.

**निष्कर्ष :**

**महायुती आणि महाआघाडीचे निवडणुकीतील संख्याबळ**

| अ.क्र. | महायुती | | | महाआघाडीचे | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | लढवलेल्या जागा | जिंकलेल्या जाग | | लढवलेल्या जागा | जिंकलेल्या जाग |
| १ | भाजप | ५ | ४ | कॉग्रेस | ३ | १ |
| २ | शिवसेना | १ | १ | शरदचंद्र पवार राष्ट्रवादी कॉग्रेस | ४ | २ |
| ३ | राष्ट्रवादी कॉग्रेस | २ | ० | शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) | १ | ० |
| | | ८ | ५ | | ८ | ३ |

उपरोक्त तक्त्यावरून असे दिसून येत की सांगली जिल्ह्यातील आठ विधानसभा मतदार संघातील भाजप पक्षाने सर्वाधिक चार जागा जिकल्या असून जिल्ह्यात भाजप पक्ष नंबर एकच पक्ष झाला आहे. या मतदार स्म्घाता राष्ट्रवादी कॉग्रेस पक्ष व शरदचंद्र राष्ट्रवादी कॉग्रेस पक्षाच्या लढतीमध्ये शरद चंद्र राष्ट्रवादी कॉग्रेस पक्षाने दोन्ही जागा जिंकून जिल्ह्यात शरदचंद्र राष्ट्रवादी कॉग्रेस पक्षाचा प्रभाव असल्याचे सिद्ध केले आहे. यावेळी अजित पवार यांच्या राष्ट्रवादी कॉग्रेस पक्षाला एकही जागा मिळाली नसल्याचे दिसते. तर शिवसेना पक्षाने एक जाग जिंकून पारंपरिक असलेल्या मतदार संघावर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाला हरवून विजय प्राप्त केला आहे. एकूणच २०२४ च्या निवडणुकीत महायुतीला यश प्राप्त झाले असलेले दिसून येते.

**संदर्भ सूची :**

१. महाराष्ट्र निवडणूक आयोगा वेबसाईट
२. दैनिक लोकसत्ता
३. दैनिक लोकमत
४. दैनिक सकाळ
५. दैनिक महाराष्ट्र टाईम्स